# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक क्र.192/२०२६

वित्त व लेखा विभागाचे परिपत्रक क्रमांक १६६/२०२६ दि.३१ जुलै २०२६ नुसार विद्यापीठ आस्थापनेतील संबंधित शासनमान्य पदावरील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी / कर्मचारी यांना सेवार्थ प्रणालीतील ई-केवायसी पूर्ण करणेबाबत कळविण्यात आले होते.

प्राप्त आदेशानुसार या परिपत्रकाव्दारे खालील नमूद पदावरील कार्यरत शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की,

१) सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी / कर्मचाऱ्यांचे वेतन सेवार्थ प्रणालीप्रमाणे मा. सहसंचालक कार्यालयामार्फत सेवकांच्या बॅक खात्यामध्ये परस्पर जमा करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

२) शासनमान्य पदावर कार्यरत परंतु सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ठ नसलेले सेवक तसेच विद्यापीठ निधीतील सेवकांचे वेतन पूर्वीप्रमाणेच होईल.

३) विद्यापीठातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना (शासनमान्य / विद्यापीठ निधी / योजनेअंतर्गत कार्यरत) सूचित करण्यात येते की, त्यांनी घेतलेल्या गृहकर्ज / वैयक्तिक कर्ज / वाहन कर्ज इ. व जीवन विमा हप्ता (LIC Premium) किंवा इतर कर्ज हप्त्याची वजावट ही वेतनामधून न ठेवता परस्पर आपल्या बॅक खात्यामधून वजावट करण्यासाठी आपल्या बॅकेस सूचित करण्यात यावे जेणेकरून सेवकांचे सिबील गुणांकन (Cibil Score) किंवा कर्ज हप्त्याच्या व्याजावर परिणाम होणार नाही.

४) विद्यापीठाकडून देण्यात आलेली उचल रक्कम (दिवाळी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, ख्रिसमस, वैद्यकीय उचल, शैक्षणिक अग्रिम, इतर उचल (Other Advance) इत्यादी व सेवक सहकारी पतपेढी हप्ता, जी.एस.एल.आय. पॉलिसी हप्ता व विद्यापीठाशी संबंधीत इतर वसुली ही पूर्वीप्रमाणे वेतनामधून कपात करण्यात येणार आहे.

५) शासनमान्य पदावरील अद्याप ज्या सेवकांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही त्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण होऊन सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट होईपर्यत सदर सेवकांचे मा. सहसंचालक कार्यालयामार्फत वेतन अदायगी होणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. मा. सहसंचालक कार्यालयाकडून जेव्हा या सेवकांचे वेतन अनुदान प्राप्त होईल तद्नंतर त्यांना एकत्रित वेतन फरक आदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(सीएमए (डॉ.) चारूशीला गायके)
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे - ४११००७
जावक क्र. वित्त /२०२६-२७/ 612
दिनांक : ०१/०९/२०२६

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१) मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग
२) मा. संचालक, प्रशाला
३) मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

) यांना विनंती की, आपल्या विभागातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणावे.